



महाराष्ट्र शासन

# महिला व बाल विकास विभाग

# " मुख्यमंत्री - माझी लाडकी बहीण योजना "

## योजनेचे स्वरुप

प्रत्येक पात्र महिलेला तिच्या स्वतःच्या आधार लिंक केलेल्या सक्षम बँक खात्यात DBT व्दारे दरमहा **रु.१५००/-** इतकी रक्कम दिली जाईल.

## योजनेचे लाभार्थी

महाराष्ट्र राज्यातील २१ ते ६५ या वर्ष वयोगटातील विवाहीत, विधवा,घटस्फोटीत , परित्यक्त्या आणि निराधार महिला तसेच त्या कुटूंबातील केवळ एक अविवाहीत महिला.

## पात्रता

१. महाराष्ट्र राज्याचे रहिवाशी असणे आवश्यक.
२. राज्यातील विवाहीत, विधवा, घटस्पोटीत, परित्यक्त्या आणि निराधार महिला तसेच त्या कुटूंबातील केवळ एक अविवाहीत महिला.
३. किमान वयाची २१ वर्षे पुर्ण व कमाल वयाची ६५ वर्ष पुर्ण होईपर्यंत
४. लाभार्थ्यांचे स्वतःचे आधार लिंक असलेले बँक खाते असणे आवश्यक
५. लाभार्थी कुटूंबाचे वार्षिक उत्पन्न रु.२.५० लाखापेक्षा जास्त नसावे.

## आवश्यक कागदपत्रे

१. आधार कार्ड (अर्जामध्ये आधारकार्ड वरील नांव नमुद करावे)
२. अधिवास प्रमाणपत्र / जन्म प्रमाणपत्र / शाळा सोडल्याचा दाखला (अधिवास प्रमाणपत्र उपलब्ध नसेल तर महिलेचे १५ वर्षापूर्वीचे रेशनकार्ड / मतदार ओळखपत्र/ जन्म प्रमाणपत्र / शाळा सोडल्याचा दाखला
३. महिलेचा जन्म परराज्यातील असल्यास पतीचा जन्म दाखला/ शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र / अधिवास प्रमाणपत्र
४. उत्पन्न प्रमाणपत्र (रु.२.५० लाखापर्यंत)/ पिवळे / केशरी रेशनकार्ड
५. अर्जदाराचे हमीपत्र
६. बँक पासबुक(आधार लिंक असलेले)
७. अर्जदाराचा फोटो (स्वतः लाभार्थी महिला उपस्थित असणे आवश्यक)

## अपात्रता

१. कुटूंबाचे एकत्रित वार्षिक उत्पन्न रु.२.५० लाख रुपयांपेक्षा अधिक आहे.
२. ज्यांच्या कुटूंबातील सदस्य आयकरदाता आहे.
३. ज्यांच्या कुटूंबातील सदस्य नियमित / कायम कर्मचारी म्हणून सरकारी विभाग / उपक्रम /मंडळ /भारत सरकार किंवा राज्य सरकारच्या स्थानिक संस्थेमध्ये कार्यरत आहेत किंवा सेवानिवृत्तीनंतर निवृत्तीवेतन घेत आहेत. तथापि. रु.२.५० लाखा पर्यंत उत्पन्न असलेले बाह्य यंत्रणाव्दारे कार्यरत असलेले कर्मचारी, स्वयंसेवी कामगार आणि कंत्राटी कर्मचारी पात्र ठरतील.
४. सदर लाभार्थी महिलेने शासनाच्या इतर विभागा मार्फत राबविण्यात येणाऱ्या आर्थिक योजनेव्दारा दरमहा रु.१५००/- किंवा त्यापेक्षा जास्त रकमेचा लाभ घेत असेल.
५. ज्यांच्या कुटूंबातील सदस्य विद्यमान किंवा माजी खासदार / आमदार आहे.
६. ज्यांच्या कुटूंबातील सदस्य भारत सरकार किंवा अध्यक्ष / उपाध्यक्ष/ संचालक /सदस्य आहेत.
७. ज्यांच्याकडे चारचाकी वाहन (ट्रॅक्टर वगळून) त्यांच्या कुंटूबातील सदस्याच्या नावांवर नोंदणीकृत आहेत.

**अर्ज करण्याची पध्दत** योजनेचे अर्ज पोर्टल / मोबाईल ॲपव्दारे / सेतु सुविधा केंद्राव्दारे ऑनलाईन भरले जाऊ शकतात.

**अर्ज करण्याची प्रकिया** १) पात्र महिलेस ऑनलाइन नारीशक्ती दूत ॲपव्दारे अर्ज करता येईल. नारीशक्ती दूत ॲपव्दारे अर्ज करण्यासाठी खालील लिंकवर क्लिक करावे.
https ://play.google.com./store/apps/details?id=com.saaviinfinet.narishakti_yojana_doot

२) ज्या महिलेस ऑनलाइन अर्ज करता येत नसेल, त्यासाठी अर्ज भरण्याची सुविधा अंगणवाडी केंद्रात / बाल विकास प्रकल्प अधिकारी कार्यालये (नागरी /ग्रामीण / आदिवासी)/ ग्रामपंचायत /वार्ड / सेतू सुविधा केंद्र येथे उपलब्ध असेल. या अर्जासाठी कोणत्याही प्रकारचे शुल्क आकारले जाणार नाही.

३) वरील अर्ज अंगणवाडी केंद्रात / बाल विकास प्रकल्प अधिकारी कार्यालये(नागरी/ग्रामीण/आदिवासी) सेतू सुविधा केंद्र येथे ऑनलाइन प्रविष्ट केला जाईल व प्रत्येक अर्जासाठी यथायोग्य पोच पावती दिली जाईल.

**या योजनेबाबतच्या अधिक माहितीसाठी महिला हेल्पलाइन टोल फ्री संपर्क क्रमांक 181**

Scanned with OKEN Scanner